महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
तंत्र शिक्षण संचालनालय , महाराष्ट्र राज्य,३, महापालिका मार्ग, मुंबई ४००००१
दूरध्वनी क्रमांक: ०२२ -२२६२०६०१/२२६९०६०२/२२६४११५०/२२६४११५१ फॅक्स - २२६९ २१०२.
ई-मेल:- director@dtemaharashtra.gov.in संकेतस्थळ: www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: क्रमांक :का.क्र.१९/परदेशी शिष्यवृत्ती योजना /२०१८-१९/ १४३ दिनांक : ०६ ऑक्टोबर २०१८

## "जाहिरात"

**उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती निवडीसाठी सन २०१८-१९ करिता विद्यार्थ्याकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील **खुल्या प्रवर्गातील** जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी, THE (Times Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्रवेश घेतला असेल अथवा प्रवेश घेतील, अशा २० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्याबाबतची योजना, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राबविण्यात येण्यासंबंधीचा शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक: ०४ ऑक्टोबर, २०१८ जाहीर करण्यात आलेला आहे. सदर शिष्यवृत्तीसाठी शाखा / अभ्यासक्रम निहाय खालीलप्रमाणे जागा उपलब्ध असतील:-

| अ.क्र. | शाखा / अभ्यासक्रम | पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका | डॉक्टरेट | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | कला | ०१ | ०१ | ०२ |
| २. | वाणिज्य | ०१ | ०१ | ०२ |
| ३. | विज्ञान | ०१ | ०१ | ०२ |
| ४. | व्यवस्थापन | ०१ | ०१ | ०२ |
| ५. | विधी अभ्यासक्रम | ०१ | ०१ | ०२ |
| ६. | अभियांत्रिकी/वास्तुकला शास्त्र | ०४ | ०४ | ०८ |
| ७. | औषधनिर्माणशास्त्र | ०१ | ०१ | ०२ |
| | एकूण | १० | १० | २० |

विद्यार्थी व विद्यार्थ्याचे आई / वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी आहेत व विद्यार्थ्यास परदेशातील THE /QS अद्ययावत वर्ल्ड रॅन्कींगमध्ये २०० च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्था / विद्यापीठामध्ये पूर्णवेळ पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका किंवा पीएचडी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी गुणवत्तेनुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्रवेश मिळालेला आहे तसेच विद्यार्थ्याच्या

पालकांचे/कुटुबांचे व विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २०.०० लाखापेक्षा जास्त नाही अश्या विध्यार्थ्याकडून या योजने अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी online पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक विध्यार्थ्यानी www.dtemaharashtra.gov.in **या संकेतस्थळावर** online पद्धतीने अर्ज भरावा व आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्र अर्जासोबत अपलोड करावीत. online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसोबत सदर अर्ज **संबंधित कोणत्याही विभागीय कार्यालयात** खालील वेळापत्रकानुसार मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी सादर करावा.

| क्र. | कार्यक्रम | कालावधी<br>पासून पर्यंत |
|---|---|---|
| १ | **संकेतस्थळावर** online पद्धतीने अर्ज भरणे व आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्र अर्जासोबत अपलोड करणे | दि.१५/१०/२०१८ ते ३०/१०/२०१८ ( सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत) |
| २ | online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सोबत मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी संबंधीत विभागीय कार्यालयात सादर करणे.<br>• कला, वाणिज्य, विज्ञान व विधी अभ्यासक्रमासाठी विभागीय कार्यालय, उच्च शिक्षण.<br>• व्यवस्थापन, अभियांत्रिकी / वास्तुकलाशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमासाठी विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण. | दि.१९/१०/२०१८ ते ०६ /११/२०१८ ( सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत) |

Online अर्जाशिवाय इतर कोणत्याही पद्धतीने केलेला अर्ज विचारात घेण्यात येणार नाही. इच्छुक उमेदवारांनी वरील प्रमाणे कार्यवाही निर्धारित कालावधीत करणे आवश्यक आहे.

उमेदवारांनी या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपध्दती इत्यादी माहिती करिता उपरोक्त दिनांक: ०४ ऑक्टोबर, २०१८ रोजीचा शासन निर्णय बघावा. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in व या संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच विभागीय कार्यालय, उच्च शिक्षण व विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण यांची यादी संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

संचालक

तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई